REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# पेशवेकालीन व्यभिचार आणि न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे

प्रा. डॉ. निलीमा दिपक राऊत
डॉ. पंजाबराव देशमुख कला व वाणिज्य महा. नागपूर

**प्रस्तावना :**



महाराष्ट्राच्या सतराव्या, अठराव्या शतकाच्या इतिहासातील अनेक व्यक्तींनी मराठी व अमराठी माणसांना काही कमीअधिक प्रमाणात आकर्षित करुन घेतलेले आहे. त्यातील काही रणमैदानांवर तलवार गाजविणारे होते, तर काही धर्मकारण किंवा राजकारणाशी संबंधीत होते. मराठयांच्या इतिहासातील एक नाव मात्र असे आहे की जे युध्दकारणाशी अथवा धर्मकारणाशी संबंधित नसतानाही अनेकांच्या मनात घर करुन राहिलेले आहे, ते म्हणजे न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे.

असा ब्राम्हण पूर्वी कधी झाला नाही आणि पुढे होणे नाही [१] असे पेशवा थोरला माधवराव हयांचे रामशास्त्रीविषयक उद्गार आहेत.

इ.स. १८१९ मध्ये एल्फिन्स्टनने पेशव्यांकडून जिंकलेल्या प्रदेशातील परिस्थितीविषयक आपला अहवाल लिहिला. त्यात पेशव्यांच्या न्यायदान व्यवस्थेसंबंधी लिहितांना त्याने रामशास्त्री एक विद्वान आणि तत्त्वनिष्ठ असा न्यायाधीश होऊन गेला, असे स्पष्टपणे नमूद करुन ठेवलेले आहे. [२]

इ.स. १८२६ मध्ये सातारचा पोलिटिकल एजंट कॅप्टन ग्रॅन्ट डफने आपल्या मराठयांच्या इतिहासात रामशास्त्री एक बुद्दिमान, प्रामाणिक, निःपक्षपाती, निर्लोभी आणि निर्भिड असा न्यायाधीश होऊन गेला, असा उल्लेख मिळतो. [३]

जनमानसात रामशास्त्री हया नावाची जी प्रतिमा आहे ती त्यांनी पेशवा नारायणराव हयांच्या खुनाची केलेली चौकशी आणि नंतर त्यांचे पेशवेपद बळकावणा-या राघोबादादास ठोठावलेली देहदंडाची शिक्षा, हया संबंधीच्या आख्यायिकेवर मुख्यतः उभी राहिलेली आहे.

एक विद्वान, निर्भिड आणि निस्पृह न्यायाधीश अशी त्यांची ख्याती प्रसध्दि आहे. त्यांच्या संबंधीच्या अनेक आख्यायिका चालत आलेल्या आहेत. रामशास्त्री विषयक आजपर्यंत पसिध्द झालेले व ज्याला संशोधक अव्वल दर्जाचे आणि अस्सल असे अभिलेख म्हणतात ते अत्यंत कमी आहेत, मात्र रामशास्त्री विषयक आख्यायिका मात्र त्या मानाने खूपच आहेत. [४]

न्यायधिशाचे अधिकार आणि त्याच्या मर्यादा हयाची रामशास्त्रीला पूर्ण कल्पना होती. आपण कायदे करु शकत नाही, सरकारने केलेल्या कायद्याप्रमाणे किंवा धर्मशास्त्राप्रमाणे काटेकोर निवाडा करणे हे आपले काम त्याने इमानेइतबारे केले.[५] बदकर्म हे पंचमहापातकांपैकी एक पातक हिंदू धर्मशास्त्रात समजले जाते. या पापाबद्दल पेशवाईत वेगवेगळया प्रकारच्या शिक्षा दिल्या जाते. बदकर्माच्या गुन्हयात पुरुष व स्त्री ही दोघेही सामील असल्यामुळे शिक्षेस पात्र होतात. जर स्त्रिनेच पुरुषाला व्यभिचार करण्यास भाग पाडले असेल तर पुरुषाला शिक्षा होत नसे. [६] फक्त स्त्रिलाच जातीबाहेर काढण्यात येत असे. [७]

बदकर्माचा गुन्हा असा आहे की, तो झाल्याचे सिध्द होणे कित्येकदा कठीण जाते. ब्राम्हण स्त्री अगर पुरुषाचा कनिष्ठ जातीच्या स्त्री अगर पुरुषाशी संबंध असला तर त्याला प्रतिलोम संबंध मानत किंवा उलट असल्यास त्यास अनुलोम संबंध मनत[८] व्यभिचाराच्या गुन्हयातही न्याय देताना व्यक्तीची जात व त्याची सामाजिक, राजकीय, धार्मिक प्रतिष्ठा लक्षात घेतली जात असे. श्रीमंत वर्गाकडून जबर राजदंड वसूल करण्यात येत असे. [९] आरोपी ब्राम्हण असेल तर तीर्थश्रेत्रांच्या ठिकाणी प्रायचित्ते व उपोषणे सांगितली जात असल्याचे दिसून येते. [१०]

एका ब्राम्हणाने सुरापान करुन चिकोडी येथील सई देशमुख हिच्याशी बदकर्म केले. यात एकंदरीत ब्राम्हणाच्या हातून दोन पापे घडली. त्याबद्दल या ब्राम्हणास काय शिक्षा करावयाची असे माधवराव पेशव्याने विचारले असता, " बदकर्माचे प्रायश्चित्त किरकोळ पण सुरापानाचे मात्र फार कठीण " असे उत्तर रामशास्त्रीने माधवराव पेशव्यास दिले [११]

या अशाच प्रकारचे एक उदाहरण पारगाव येथे घडले. बालांजी धोंडदेऊ कुलकर्णी, मौजे पेठ पारगाव तालुका खेड सरकार जुन्नर याने कलावंतिनी समागमे गमन व भोजन व मांसभक्षण व सुरापान केले. यामुळे पतित जाला व यामुळे समस्त भाऊबंद आपाक्त झाले, म्हणून हुजूर ब्रम्हसभा करुन धर्मशास्त्रामते यास प्रायोछित घावयाचा निर्णय करुन पूर्वांग प्रायोछित यास देऊन प्रिथवी प्रदक्षण तीर्थस्नाने करावयाचे आज्ञा केली आहे. प्रदक्षणेस व तीर्थस्नानास पाठविला आहे हा श्रीपुण्य-क्षेत्री (पुणतांबा) क्षेत्री येऊन वास करुन श्रीगंगेची तीर्थस्नाने करील. [१२]

एकंदरीत बालाजी धोंडदेऊ कुलकर्णीने तत्कालिन पापापैकी कुठलेही पाप करावयाचे शिल्लक ठेवले नाही, असे असतानाही ब्रम्हसभेने धर्मशास्त्रानुसार त्यास पृथ्वी प्रदक्षिणा व गंगेत (गोदावरी) स्नान करण्याची शिक्षा दिली. यावरुन तत्कालीन समाज या असभ्य अपराधाकडे फार मोठा अक्षम्य अपराध केला आहे असे समजत नव्हता. रामशास्त्रीने माधवराव पेशव्यास दिलेले उत्तर व ब्रम्हसभेने बालाजी धोंडदेऊ कुलकर्णीस दिलेली शिक्षा याचे आज आपल्याला आश्चर्य वाटते. परंतु रामशास्त्रीने व ब्रम्हसभेने तत्कालीन पध्दतीप्रमाणे स्मृतीग्रंथास आधार धरुनचे उत्तर दिलेले होते. [१३]

इ.स. १७२७ मध्ये सासवड येथील गंगाजी जगताप देशमुख याने सात सहका-यांसह महार स्त्रीशी व्यभिचार केला. तेव्हा ज्ञातिसभा होऊन या व्यभिचाराची चौकशी झाली. या चौकशीत गंगाजी जगताप देशमुखाने आपल्या सात सहका-यांसह महार स्त्रीशी व्यभिचार केल्याचे सिध्द झाले. तेव्हा या सर्वांस शिक्षा म्हणून काशी रामेश्वरची यात्रा करुन येण्यास सांगण्यात आले. यात्रा करुन परत आल्यावरच त्या सर्वांना त्यांच्या कुटूंबासह जातीत घ्यावे असे ज्ञाती सभेने ठरविले. [१४]

इ.स. १७८१ मध्ये विठ्ठल जोशी या ब्राम्हणाच्या खुनाच्या संदर्भात महादेव भट जोशींच्या बायकोस संपूर्ण कुटुंबासह ज्ञाती बहिष्कृत करण्यात आले. तेव्हा महादेव भट जोशीचे पेशव्यांच्या दरबारात क्षमायाचना अर्ज करुन न्यायधीश रामशास्त्रीकडून प्रायश्चित्त घेण्याचा आदेश मिळविला. [१५] या प्रकरणाच्या चौकशीत ब्राम्हन स्त्रीने (महादेव भट जोशीची बायको) बुध्दिपुरस्सर विठ्ठल जोशीचा खून केल्याचे सिध्द झाले. पण त्यांचे अनैतिक संबंध असल्याचे सिध्द झाले नाही. तेव्हा शिक्षा देताना स्त्री जात (अबला) व ब्राम्हण समजून पुरुषास देतात, त्यापेक्षा निम्मीच म्हणजे त्र्यंबकेश्वरी १४४ प्रदक्षिणा घालणे व रोज गंगास्नान करणे अशी शिक्षा देऊन ती उपभोगल्याचे सर्टिफिकेट क्षेत्रस्थ ब्राम्हणा कडून घेवून आल्यावरच तिला शुध्द करुन जातीत घेण्याचा आदेश रामशास्त्रीने दिला.

रामचंद्र नारायण राघोबादादास लिहितो की, नारायणगाव येथील एका विधवा सकेशा ब्राम्हण स्त्रिस वैशाख महिन्यात कासाराबरोबर व्यभिचार करताना पकडण्यात आले. सबब कासारास अटक करुन ब्राम्हण विधवेचे घर जप्त करण्यात आले व तिला गावाबाहेर काढण्यात आहे. त्यानंतर ती विधवा स्त्री जुन्नर येथे येऊन राहिली. तेथेही तिला शिष्याबरोबर बदकर्म करताना पकडण्यात आले. तेव्हा त्या स्त्रीला शिक्षा देण्याच्या उद्देशाने ब्रम्हसभेने तिची दोन्ही मुले समाजात ठेवून तिला मात्र जातीबहिष्कृत करुन गावाबाहेर काढले. [१६]

इ.स. १७८१-८२ मध्ये जानेजी डावरा प्रांत जुन्नर याची बायको अहिली हिणे देवजी खंडोजी याजवळ बद्दकर्म केले.......... तिचे पारिपत्य जाहले नाही.............अहिलीचे नाक कापून सोडून देणे................" अशा त-हेने एखाद्या स्त्रीचे नाक किंवा कान कापून तिला विद्रुप करुन सोडून देत असत. हेतु असा की, पुन्हा तिने पापचरण करु नये आणि इतरांनाही दहशत बसावी या दोन्ही कारणास्तव अशा भयंकर शिक्षा देत असत.[१७]

किल्लेदारासारख्या मातब्बर आणि जबाबदार अधिका-याने अनैतिक वर्तन केल्याबद्दल त्याला तोफेच्या तोंडी देण्याची किंवा त्याचा कडेलोट करण्याची शिक्षा फर्मावलेली होती. [१८]

श्रीमंत वर्गाकडून बदकर्माचा गुन्हा घडल्यास जबर राजदंड वसूल करण्यात येत असे [१९] वतनदार किंवा त्याची पत्नी व्यभिचारी असल्याबद्दल त्यांच्याकडून दंड म्हणून मोठी रक्कम वसूल केली शिवाय त्यांच्या कडून पून्हा गुन्हा करणार नाही म्हणून जामिनही घेतला [२०] एका तेलंगी ब्राम्हणाकडून व्यभिचार घडला पण त्याचेकडून काहीच द्रव्यपाणी घेण्यासारखी नसल्याने त्याला आठ वर्षे उत्तरेत यात्रा करण्यात सांगीतले. [२१]

बदकर्माबद्दल (अर्थ) दंड ही एक शिक्षा असे. पण हा दंड द्रव्यरुपानेच भरावा अशी सक्ती नव्हती. एक गवळी व गवळण यांनी बदकर्माचा गुन्हा केला म्हणून त्यांच्या पासून एक खंडी तूप सरकारात घ्यावे असा निकाल देण्यात आला. [२२] फासेपारध्याच्या जमातीत व्यभिचार केला तर १५ ते १२५ रुपयापर्यंत दंड करीत, महारांच्यात २० रुपयापर्यंत दंड घेत. काही वेळा अपराध्याच्या तोंडाला काळे फासून गाढवावरुन दींड ही काढीत.[२३]

बलात्कार करणारा ब्राम्हण किंवा मातब्बर माणूस असला तर दंड करीत पण खालच्या जातीतील माणसाने ब्राम्हण स्त्रिवर बलात्कार केला तर त्याचे हात पाय तोडीत किंवा फाशी देत असत.

इ.स. १७७१ मध्ये पुण्यातील सोनार धाकसेठचा प्रबंध मोठा भाऊ जिवसेठ मृत्यू पावला. तेव्हा त्याच्या विधवा बायकोस जळगावच्या सोनार कृष्णसेठ महाडीक याने सहानुभूती दाखवून आपल्या घरी नेले. तेथे तिच्याशी शरीरसंबंध ठेवल्याने तिच्या पोटात त्याचा गर्भ वाढू लागला. ही माहिती सरकारला समजतात. कृष्णसेठ महाडीकडून बदकर्म केल्याबद्दल दंड वसूल करण्यात आला. [२३]

तसेच बदकर्म केलेल्या व्यक्तीस जाती बहिष्कृत केल्या जात असून त्याचे समाजातील रोटी-बेटी व्यवहार बंद केले जात असल्याचे दिसून येते. [२५]

उपरोक्त माहितीवरुन अधिका-यांना व्यभिचाराबद्दल कडक शासन तर ब्राम्हणांना सौम्य शिक्षा देत असत. म्हणजे एकाच गुन्हयाला जाती व वर्गनिहाय निरनिराळया शिक्षा देण्याची पध्दती होती हे स्पष्ट होते. रामशास्त्री प्रभुणे हे तत्कालीन ब्राम्हणी संस्कृतीच्या चौकटीतलाच माणूस असल्याचे त्याचे न्यायनिवाडे पाहता लक्षात येते. बदकर्माच्या गुन्हयांना न्यायव्यवस्थेने शास्त्राचा, रुढीचा व परंपरेचा आधार घेऊन कसे सोडविले याचे मार्गदर्शन वरील कागदपत्रातून स्पष्ट होते. अशा रामशास्त्रीचा दिनांक २३ ऑक्टोंबर १७८९ रोजी झाला. इ.स. १७८९ पर्यंत ते पेशव्यांच्या दरबारात मुख्य न्यायाधीश म्हणून कार्यरत असल्याचे या कागदपत्रावरुन सिध्द होते. हे मराठयांच्या इतिहासाच्या संदर्भात महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :-**


(१) आठवले सदाशिव, रामशास्त्री प्रभुणे चरीत्र व पत्रे, श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९८८, पत्र क्रमांक १०, पृष्ठ ३८
(२) डॉ. देशपांडे प्र. नं. व प्रा. हजिरनिस वा. ग. (संपा.) संशोधन मंडळाचे त्रैमासिक वर्ष ३८ अंक- ३, सप्टेंबर २००० पृष्ठ ३८
(३) उपरोक्त, पृष्ठ ३८
(४) पारसनीस द.ब. आणि आपटे ह.ना. कुलकर्णी आणि मंडळी संपादीत रामशास्त्री प्रभुणे, ज्युन्या ऐतिहासिक गोष्टी भारवर्ष (नियतकालीक) पुस्तक २, वर्ष दुसरे, एप्रिल १८९९ - मार्च १९००, डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे १९०० पृष्ठे १ ते ४
(५) संशोधन मंडळाचे त्रैमासिक वर्ष ३८, अंक ३, पृष्ठ ४४
(६) डॉ. कुलकर्णी म.रा. पेशवाईतील न्यायदान, मानसन्मान प्रकाशन, पुणे, १९९९ पत्र क्र. ७५ पृष्ठ ८७
(७) उपरोक्त पृष्ठ ८८
(८) संशोधन मंडळाचे त्रैमासिक, वर्ष ३८, अंक ३, पृष्ठ ४३
(९) पेशवाईतील न्यायदान, पत्र क्रं. ५१, पृष्ठ ६१
(१०) वाड ग.चि (संपा) सिलेक्शन फ्रॉम दि सातारा राजाज ॲन्ड दि पेशवा डायरीज दोन, बालाजी बाजीराव पेशवा भाग-२ दि डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, डी.बी. पारसनीस, पुणे १९०६, नोंद ६३
(११) उपरोक्त पृष्ठ ६४, ६५
(१२) पेशवाईतील न्यायदान, पत्र क्र. ७४ पृष्ठ ८६
(१३) संशोधन मंडळाचे त्रैमासिक, वर्ष ३८, अंक ३, पृष्ठ ४४
(१४) सरदेसाई गो.स., पेशवे दप्तर भाग ४३, गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, १९३४, पत्र क्र. १५१, पृष्ठ १२०, १२१
(१५) भावे. वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली १९७६, पृष्ठ ३८९
(१६) वाड. ग. चि. (संपा.) पेशवा रोजनिशी ८, भाग ३, वर्ष १९११, लेख : ९१८, ९२०, पृष्ठ १०९
(१७) उपरोक्त
(१८) पेशवा रोजनीशी २ पृष्ठ १९२, १९३
(१९) उपरोक्त पृष्ठ ७२
(२०) पेशवा रोजनिशी ८, भाग ३ पृष्ठ २२८
(२१) उपरोक्त पृष्ठ २२९
(२२) पेशवेकालीन न्यायव्यवस्था, पृष्ठ ८१
(२३) पेशवा रोजनिशी ८, भाग ३, पृष्ठ १०८
(२४) पेशवेकालीन न्यायव्यवस्था, पृष्ठ ७४
(२५) उपरोक्त